## ठाणे महानगरपालिका,ठाणे.
## शहर विकास विभाग,
## सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेणेकरीता कंत्राटी जाहिरात.

**वाचा :- शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/दिनांक १७ डिसेंबर २०१६.**

ठाणे महानगरपालिका अंतर्गत शहर विकास विभागाकरीता तांत्रिक/अतांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता व विवक्षित कामाची निकड लक्षात घेता विभागाकरीता अनुभवी खालील दिलेल्या पदावर शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांची करार पध्दतीवर आवश्यकता असल्याने. खालील पदांची जाहिरात सहा महिन्याच्या कालावधीकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/दिनांक १७ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडुन अर्ज ठाणे महानगरपालिका, ठाणे, शहर विकास विभाग, प्रशासकीय भवन, चौथा मजला, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचेकडे दि.११/१२/२०२१ ते दि. १८/१२/२०२१ या कालावधीत मागविण्यात येत आहेत. अर्जाच्या लिफाफयावर करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी अर्ज असे ठळक अक्षरांत नमूद करावे. अर्जासोबत स्वत:चा पत्ता असलेला व त्यावर रु.५/- चे पोस्ट मुंद्राक चिकटवेल्या १५ सें.मी x १० सें.मी. आकाराचा लिफाफा पाठविण्यात यावा. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

| अ.क्र | पदाचे नाव | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | उप अधिक्षक, भुमिअभिलेख (सेवानिवृत्त) | ०१ |
| २. | तहसीलदार, (सेवानिवृत्त) | ०१ |
| ३ | समाज विकास अधिकारी, (सेवानिवृत्त) | ०१ |
| ४ | भुमापक, (सेवानिवृत्त) | ०२ |

सदरची पदे निव्वळ सहा महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणार असून पदाचा कार्यकाळ सहा महिन्याचा असेल, आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यात येईल. उक्त पदाचे मासिक परिश्रमिक हे शासन निर्णयामध्ये नमुद परिशिष्ट-अ नुसार अदा करण्यात येईल. तसेच उक्त शासन निर्णयानुसार इच्छुक उमेदवाराची कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी. उमेदवारांनी संदर्भिय शासन निर्णयानुसार अर्ज संपूर्ण माहिती बायोडाटासह/फोटो व आवश्यक शैक्षणिक प्रमाणपत्र व सेवानिवृत्त आदेशासह (संबंधित कोषागार कार्यालयाचा दाखला व सेवा निवृत्ती पुर्व घेतलेल्या वेतनाचा संबंधित कार्यालयाचा दाखला) अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

(संजय हेरवाडे)
अतिरिक्त आयुक्त -२
ठाणे महानगरपालिका,ठाणे.